माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ, अमरावती
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : २६१५/२०२१**

**अपिलार्थी :- श्री.गौतम उध्दव घनबहाददूर**
**मु.पो.चांदुर जहानपूर, ता. दर्यापूर, जि.अमरावती.**

**विरुध्द**

**उत्तरार्थी :- १. जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत कार्यालय, पेठइतबारपुर, ता. दर्यापूर, जि.अमरावती.**

**२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती , दर्यापूर ता.दर्यापूर, जि.अमरावती.**

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २२.०९.२०२५**

| | | |
|---|---|---|
| **अपिलकर्ता** | : | **उपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित** |
| **प्रथम अपिलीय अधिकारी** | : | **उपस्थित** |

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास दिलेल्या पत्राचा दिनांक | प्रथम अपील अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १५.०४.२०२१ | २६.०४.२०२१ | ३१.०५.२०२१ | १२.०७.२०२१ |

१. अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये **दिनांक १५.०९.२०२१** रोजी **जोडपत्र-क** या नमुन्यात आयोगाचे स्तरावर द्वितीय अपील अर्ज दाखल केले. सदर अपील दाखल करण्याच्या प्रयोजनामध्ये "माहिती न देणे, दिशाभूल करणे", असे नमूद केले आहे.

२. सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सचिव, श्री.आशिष गवई, तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.ए.डी.रायबोले तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, श्री.सी.जे.ढवक व श्रीमती ज्योती अडसोड उपस्थित आहेत.

३. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) नुसार अपिलार्थी यांनी **दिनांक १५.०४.२०२१** रोजी **जोडपत्र-अ** या नमुन्यात पंचायत समिती, दर्यापूर यांचेकडे रीतसर अर्ज दाखल करुन त्यामध्ये "१) सामान्य फंड बँकेत जमा केल्याची तारीख व वर्ष ही माहिती लेखी देणे २) अग्रवाल रोड बांधकाम कंपनीची सामान्य फंड पावतीची झे. प्रत ३) पेट्रोल पंप, दुकाने, व्यावसायीक दुकाने अमरावती रोड वरचे ग्रामपंचायत पेठइतबारपूर हद्दीतील यांची सामान्य फंडाची पावतीची झेरॉक्स प्रत" इ. माहिती मागितली होती. सदर अर्ज सहायक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती दर्यापूर यांनी जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, पेठइतबारपूर यांच्याकडे पत्र क्र.८९०, दि.१५.०४.२०२१ नुसार अधिनियमाचे कलम ६ (३) अन्वये वर्ग केला व तसे अपिलार्थीस कळविले.

४. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.२६.०४.२०२१ रोजी रजिस्टर पोस्टाने पत्र पाठवून, "*आपण अर्जासोबत दारिद्र्य रेषेखाली असल्याबाबतचा कोणताही पुरावा जोडला नसल्यामुळे माहितीच्या झेरॉक्स प्रतीचा*

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय
सत्यमेव जयते
अमरावती

*खर्च रु.९०/- व पोस्टाचा खर्च रु.३०/- अशा एकूण रु.१२०/- चा भरणा ग्रामपंचायत कार्यालयात करावा"* असे कळविले.

५. मात्र अपिलार्थीला अभिप्रेत माहिती न मिळाल्यामुळे अपिलार्थी यांनी व्यथित होवून **दिनांक ३१.०५.२०२१** रोजी कलम १९ (१) नुसार **जोडपत्र-ब** मध्ये प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल करुन त्याच्या कारणामध्ये "माहिती न देणे, दिशाभूल करणे" असे नमूद केले आहे.

६. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२.०७.२०२१ रोजी प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन, *"जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना ७ दिवसाचे आत माहिती निशुल्क देण्यात"* असे आदेश पारित केले. या सुनावणीत जन माहिती अधिकाऱ्याने सांगीतले की, "अपिलार्थीकडे *दारिद्य रेषेखाली कार्ड नसल्याने त्यांना रु.१२०/- भरण्याबाबत कळविले*" त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी *"अर्जासोबत पिवळे रेशनकार्डची झेरॉक्स प्रत जोडलेली असल्यामुळे माहिती ७ दिवसात निशुल्क देण्यात यावी"* असे जन माहिती अधिकारी यांना निर्देश दिले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.२८.०६.२०२५ रोजी रजिस्टर पोस्टाने माहिती पाठविली तसेच पत्र व पोस्टाची पावती सोबत जोडली. या सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

७. व्दितीय अपिलाच्या सुनावणीत अपिलार्थी म्हणाले की, त्यांना ४ वर्ष उलटुनही ऑडीट रिपोर्ट मिळालेला नाही. दि.०१.०७.२०२५ रोजीचे रफत व अग्रवाल यांचे रु.५०००/- कुठल्या बँकेत भरले व कधी भरले याबाबतचा तपशील दिला नाही. तेव्हा अपिलार्थीस बँक स्टेटमेंट दिले असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सांगीतले.

८. दि.०१.०७.२०२५ रोजी आयोगासमक्ष झालेल्या व्दितीय अपिलाच्या सुनावणीत जन माहिती अधिकारी यांनी सांगीतले होते की, काही चलानी आढळत नाही तेव्हा पुढील सुनावणीच्यावेळी ऑडिट रिपोर्ट दाखल करा अशा सूचना आयोगाने श्री.आशिष गवई यांना दिल्या होत्या, परंतू जवळपास पावणेतीन महिन्याचा कालावधी उलटुनही श्री. गवई यांनी कुठलाही रिपोर्ट आयोगासमक्ष सादर केला नाही. मागील तारखेस जन माहिती अधिकारी हजर असतांनाही त्यांनी माहिती दिली नाही यावरुन malafied intention असल्याचे दिसून येते. श्री.आशिष गवई यांना ही शेवटली संधी देण्यात येत असून ऑडिट रिपोर्ट दाखल न केल्यास, आयोगाच्या निर्देशांचे पालन न केल्याबद्दल शास्ती करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

९. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर व सुनावणीच्यावेळीचा युक्तिवाद विचारात घेऊन आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**अंतरिम आदेश**

१. पुढील सुनावणीच्यावेळी ऑडिट रिपोर्ट दाखल करावा.
२. पुढील सुनावणी दिनांक २५.०९.२०२५ रोजी, दुपारी ०२.०० वाजता ठेवण्यात आली आहे.

Thakare

**(रविंद्र ठाकरे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, अमरावती.**

राज्य माहिती आयोग खंडपीठ कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती
सत्यमेव जयते

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : २२.०९.२०२५**
जावक क्रमांक ५६०० दिनांक 24 SEP 2025

MJG